## निशाणी क्र. १७७ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ६ यांचे वारस दाखल करणेस झालेला विलंब माफ करून वारस दाखल करणेसाठी केला आहे. तिच्या म्हणण्यानुसार, सदर कामातील प्रतिवादी क्र. ६ विठा उर्फ गीता रामचंद्र देवडा ही दि. १२/०३/२०१९ रोजी मयत झाली आहे. प्रस्तूत प्रतिवादी ही मुंबई येथे राहत होती. तसेच तीचा वादींशी कायमचा संपर्क नव्हता. त्यामुळे ती मयत झाल्याबाबतची कोणतीही माहिती प्रस्तूत वादींना मिळालेली नव्हती. प्रतिवादी क्र. ७ चे वारसांच्या पत्त्याबाबत प्रस्तूत प्रतिवादींच्या मुलांशी संपर्क केला त्यावेळी प्रस्तूत प्रतिवादी क्र. ६ विठा रामचंद्र देवडा ही दि. १२/०३/२०१९ रोजी मयत झाल्याचे समजले. त्यामुळे प्रस्तूत प्रतिवादीचे वारस दाखल करणेस विलंब झाला आहे. प्रस्तूत वादींनी केव्हाही मुद्दामहून वारस दाखल करणेची टाळाटाळ केलेली नाही. केवळ प्रस्तूत प्रतिवादी ही मुंबई येथे राहत असल्याने व तीचा वादींशी कायम संपर्क नसल्याने ती मयत झाल्याची माहिती वादीस मिळालेली नव्हती. प्रस्तूत प्रतिवादी मयत झाल्याची माहिती मिळाल्यावर वादी लागलीच प्रतिवादी क्र. ६ चे वारस दाखल करीत आहे. सबब सदर कामी झालेला विलंब माफ करून प्रतिवादी क्र. ६ विठा उर्फ गीता रामचंद्र देवडा हिचे वारस दाखल करणेस परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

२. प्रतिवादींनी सदर अर्जास म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्ज खोटा व खोडसाळ आहे. सदरचा अर्ज बेकायदेशीर असून नमूद कारण खोटे आहे. सबब अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती प्रस्तूत प्रतिवादींनी केली आहे.

३. वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रतिवादी क्र. ६ ही दिनांक १२/०३/२०१९ इ. रोजी मयत झाले आहेत, असे दिसून येते. प्रतिवादी क्र. ६ ही मयत झाली आहे, याबाबत वाद दिसून येत नाही. वादी यांनी सदरचा दावा वाटप व पृथक कब्जाकरीता दाखल केला आहे. सदर दाव्यास प्रतिवादी क्र. ६ चे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे सदर विलंब माफ करणे न्यायोचित वाटते. मात्र झालेल्या विलंबाबाबत वादींनी खर्च देणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचित वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. सबब, खालील आदेश पारीत करीत आहे :

**— आदेश —**

१. प्रस्तूतचा अर्ज रक्कम रू. ५००/— च्या खर्चासह मंजूर करण्यात येतो. त्यापैकी वादी यांनी रक्कम रुपये २५०/— प्रतिवादी यांना दयावेत व उर्वरित रक्कम रुपये २५०/— विधी सेवा समिती सिंधुदुर्गला जमा करावी.

स्थळ : देवगड
दिनांक : ३०/११/२०१९

( बी.आर.पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

Digitally signed by Balkrishna Rajaram Patil
Date: 2019.12.03 10:27:54 +0530